नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २०/०६/२०२६ (शनिवार )

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा अभिनव उपक्रम
## महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सुविधेसाठी मोबाईल स्वच्छतागृह वाहनाची उपलब्धता

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलामार्फत महिला अधिकारी व अंमलदारांच्या सोयीसाठी एक अभिनव व संवेदनशील उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त, निवडणूक बंदोबस्त, उत्सव, यात्रा, व्हीआयपी दौरे तसेच दीर्घकाळ चालणारे विशेष बंदोबस्तादरम्यान महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने एका वाहनाचे रूपांतर अत्याधुनिक मोबाईल स्वच्छतागृहात करण्यात आले आहे.

सदर मोबाईल स्वच्छतागृह वाहनामध्ये महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी स्वच्छ व सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, बंदोबस्ताच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार हे वाहन तैनात करण्यात येईल. तसेच रोड बंदोबस्त किंवा विविध ठिकाणी सुरू असलेल्या सुरक्षा व्यवस्थेनुसार हे वाहन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवून महिला अधिकारी व अंमलदारांना सुविधा पुरविण्यात येणार आहे.

नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील महिला अधिकारी व अंमलदार विविध जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडत असून अनेकदा त्यांना दीर्घकाळ मैदानी बंदोबस्तावर कार्य करावे लागते. अशा परिस्थितीत त्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सन्मानाचा विचार करून ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## दुकान फोडीचे ५ गुन्हे आणि वाहन चोरीचा १ गुन्हा उघड, १ टॅब , ८१ मोबाईल, २ दुचाकी वाहन, रोख रक्कमेसह एकुण ६ लाख १६ हजार ७२५ रूपयांचा मुद्देमाल जप्त,२ आरोपी अटक

## आरोपी हे खोटे बिल बुक आणि आधारकार्ड तयार करून चोरीचे मोबाईल विक्री करीत असल्याचे निष्पन्न

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २०/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने **दुकानफोडीचे ५ गुन्हे उघड, वाहन चोरीचा १ गुन्हा अशा एकुण ६ गुन्हयाची उकल केली आहे. तसेच यातील आरोपी हे खोटे बिल बुक आणि आधारकार्ड बनवुन चोरीचे मोबाईल विक्री करून मोबाईल दुकानदार यांची फसवणुक करीत असल्याचे निष्पन्न केले.**

स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे पथक उघड न झालेल्या गुन्ह्यांचा समांतर तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून घरफोडी करणारे आरोपी क्रं १) **निलेश राजु कडवे, वय २८ वर्ष, रा. प्लॉट नं. ९०, मालका कॉलनी, समता नगर, नागपुर, ह.मु. आयुष रॉय, वैभव नगर, लावा दाभा नागपुर आणि २) प्रमोद राजेश समुद्रे, वय ३१ वर्ष, दोनही रा. प्लॉट नं. ९० मालका कॉलनी, समता नगर, नागपुर यांना दिनांक २०/०६/२०२६ रोजी ताब्यात घेतले**. नमुद आरोपी यांच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी नागपुर ग्रामीण आणि शहर हद्दीत केलेल्या ५ दुकानफोडीचे गुन्हे तसेच १ वाहन चोरीचा गुन्हा अशा एकुण ६ गुन्हयांबाबत माहीती दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष २१ ॲन्ड्राईड मोबाईल, ५७ किपॅड मोबाईल व ३ जुने बंद मोवाईल असे एकुण ८१ मोबाईल आणि १ टॅब किंमती ५,०२,०७५/— रूपये , रोख रक्कम ८०००/— रूपये दोन ॲक्टीव्हा मोपेड किं. १,००,०००/— रूपये, शटर फोडीचे साहीत्य ५४५०/— रूपये, आणि ३ बनावट बिल बुक किं. १२००/— रूपये आणि २ बनावट आधार कार्ड असा एकुण ६,१६,७२५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१) पोलीस ठाणे अरोली अप. क. २४३/२६ कलम ३३१ (४),३०५ (अ) भा.न्या.सं.,

२) पोलीस ठाणे उमरेड अप.क. ६६१/२६ कलम ३३१ (४),३०५ (अ)भा.न्या.सं.,

३) पोलीस ठाणे काटोल अप.क. ६३४/२०२६ कलम ,३०५ (अ)भा. न्या.सं.,

४) पोलीस ठाणे कळमेश्वर अप.क. २९६/२०२६ कलम ३३१ (४),३०५ (अ) भा.न्या.सं.

५) पोलीस ठाणे सावनेर अप.क. ४६९/२६ कलम ३०२ (२) भा.न्या.सं.

६) पोलीस ठाणे हुडकेश्वर अप.क. ३७५/२०२६ कलम ३३ (४),३०५ (अ) भा.न्या.सं.,

**असे एकुण ६ गुन्हे उघड झाले आहे.**


पोलीस निरीक्षक


it2165S
BIG DISPLAY
NOKIA
JioBharat V4
Nokia 105 CLASSIC
JioBharat A1
JioBharat V4
Nokia 105
Nokia 106
POCO C75 5G
POCO C85 5G
15x
realme
Galaxy F17 5G
POCO M7 Plus 5G
OPPO A6x 5G
OPPO A6x 5G

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त काटोल येथे पोलीस व त्यांच्या कुटुंबीयांसाठी योग व ध्यान साधना शिबिर संपन्न

**पोलीस स्टेशन काटोल** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री पराग पोटे,उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात दिनांक १९/०६/२०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर सकाळी ०८.०० ते १०.०० वाजेदरम्यान काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल, कोंढाळी, नरखेड आणि जलालखेडा येथील पोलीस अधिकारी /अंमलदार आणि त्यांचे कुटुंबा साठी नगर भवन हॉल, काटोल येथे योग व ध्यान साधना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिरामध्ये काटोल उपविभागातील सर्व अधिकारी व अंमलदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यासाठी योगाचे महत्त्व, नियमित व्यायामाचे फायदे तसेच ध्यान साधनेद्वारे तणावमुक्त जीवनशैली कशी अंगीकारावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विविध योगासने, प्राणायाम व ध्यान प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सदर शिबिरात काटोल उपविभागातील १०० पेक्षा अधिक पोलीस अधिकारी व अंमलदार आणि त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते.





## खापा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील ३ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी क्रं **१) जीवन शंकर कोल्हे, वय ४६ वर्ष, रा. नविन वस्ती खापा, ता. सावनेर, जि. नागपूर** क्रं **२) प्रविण पुरूषोत्तम धार्मिक, वय २९ वर्ष, रा. लांबटपुरा खापा, ता. सावनेर, जि. नागपूर आणि ३) सिताराम वसंता गजभिये, वय ४८ वर्ष, रा. निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपूर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **१) जीवन शंकर कोल्हे, वय ४६ वर्ष, रा. नविन वस्ती खापा, ता. सावनेर, जि. नागपूर २) प्रविण पुरूषोत्तम धार्मिक, वय २९ वर्ष, रा. लांबटपुरा**

**खापा, ता. सावनेर, जि. नागपूर ३) सिताराम वसंता गजभिये, वय ४८ वर्ष, रा. निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपूर यांचेवर** अवैध दारू बाबत अनेक **गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **१) जीवन शंकर कोल्हे, वय ४६ वर्ष, रा. नविन वस्ती खापा, ता. सावनेर, जि. नागपूर २) प्रविण पुरूषोत्तम धार्मिक, वय २९ वर्ष, रा. लांबटपुरा खापा, ता. सावनेर, जि. नागपूर ३) सिताराम वसंता गजभिये, वय ४८ वर्ष, रा. निमतलाई, ता. सावनेर, जि. नागपूर यांना १ महीन्यांकरीता नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



हद्दपार आरोपी जीवन शंकर कोल्हे



हद्दपार आरोपी प्रविण पुरूषोत्तम धार्मिक



**हद्दपार आरोपी सिताराम वसंता गजभिये**

## केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू काढणारे तसेच विक्री करणारे ३ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन केळवद हदद्दीतील अवैध दारू काढणारे तसेच विक्री करणारे तसेच अवैध दारू व्यवसायत सक्रिय ३ आरोपी यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार केले.**

सराईत गुन्हेगार नामे १) **अमित चंद्रपाल राजपूत, वय ४१ वर्षे, रा.तिरंगी तालुका कळमेश्वर ,२)अविनाश संजय पवार, ३४ वर्षे, रा. पारधीबेडा ,तिडंगी, ता.कळमेश्वर ,३) मनोज उर्फ बबलू नारायण गुप्ता, वय ५६ वर्षे,रा.उमरी** यांचेवर अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे

नमुद आरोपीचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यांना **१ महीन्यांकरीता** नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.


**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**




**हद्दपार आरोपी अमित चंद्रपाल राजपूत**



हद्‌दपार आरोपी अविनाश संजय पवार



हद्‌दपार आरोपी मनोज उर्फ बबलू नारायण गुप्ता

# अवैधरित्या मुरूमाची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ४ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त वेलतूर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वेलतूर :— दिनांक १९/०६/२०२६ रोजी वेलतूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या मुरूमची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा चन्ना ते शिकारपुर येथे नाकाबंदी केली असता संशयित स्वराज ट्रॅक्टर क्र. एम एच ४०/ए सी ८३४३ व विना क्रमांकाची ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन चालकास पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकांनी पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन घटनास्थळाहुन पळुन गेला.

**पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता स्वराज ट्रॅक्टर क्र. एम एच ४०/ए सी ८३४३ किंमती ३,००,०००/— रूपये आणि विना क्रमांकाची ट्रॉली किंमती १,००,०००/—रूपये, ०१ ब्रास मुरूम किंमती ३,०००/— रूपये असा एकुण किंमती ४,०३,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन वेलतूर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं २०२३, ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खानी आणि नियमन अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा नोंद. ४ दुचाकी सह २ लाख ९१ हजारांचा मुद्देमाल जप्त काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :– दिनांक १९/०६/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, आजनगाव काटोल येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे काटोल पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) संजय नत्थुजी सलाम, २) अशोक तानबा कांबळे, ३) रमेश रामकृष्ण देव्हारे सर्व रा. आजानगाव ता काटोल** यांना जागीच पकडले. ०३ इसम घटनास्थळाहुन पळुन गेले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून १) ५२ तासपत्ते व रोख रक्कम १०००/– रूपये २) ४ दुचाकी वाहने किंमती २,९०,०००/– रूपये असा एकुण २,९१,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद ०६ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक १९/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन देवलापार यांनी अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** अंतर्गत आरोपी १) नरेंद्र तेजराम आहाके, वय २५ वर्ष, रा .लाखापुर, ता. रामटेक जि. नागपुर हा हिवराबाजार शिवार येथे २) चंद्रभान नारायन वंजारी, वय ५८ वर्ष रा टांगला ता. रामटेक जि. नागपुर हा मौजा टांगला येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक १९/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू असा एकुण ५०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे राजकुमार उदयभान  गजभिये वय ५८ वर्ष रा नांद ता भिवापूर जि नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे गुणवंता हरिचंद्र नेहारे, वय ३६ वर्ष, रा. चिचोली पठार, याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे रत्नाकर मधुकर सर्याम, वय २९ वर्ष, रा. कोलीतमारा, ता. पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ५५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ५,०००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७८७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २०/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७८७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे  ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३१ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १० आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३३ आरोपी अशा एकुण १५४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २०  आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे  १८ आरोपी अशा एकुण ७३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण   १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ७१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३८ आरोपी अशा एकुण १८७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने